# Glimpses of the International Yoga Day

# (A.Y. 2021-22)




**Inauguration ceremony**




**Students Performing YOGA**

# Glimpses of the Engineer's Day

# (A.Y. 2021-22)




Pratima Pujan by chief guest




**Celebration of Engineer’s Day**

# Glimpses of the Republic Day

# (A.Y. 2021-22)



**Inauguration ceremony of book**



**Speech by Prof. Yashpal Khedkar**

# Glimpses of the Cleanliness of college classroom and surrounding of college

# (A.Y. 2021-22)



**Students cleaning the classrooms**




**Students cleaning the classrooms**

# Glimpses of the National Voters Day

# (A.Y. 2021-22)




**Faculty members taking pledge on National Voter's day**






# Pledge on National Voters Day

**Voters' Pledge**

"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, community, language or any inducement".


# Shri Vithal Education & Research Institute's
# College of Engineering, Pandharpur



# Glimpses of the
# Voting Awareness Program by students

**Students spreading awareness of Voting**




**Students spreading awareness of Voting**

# Glimpses of the Essay and Poster presentation Competition


# (A.Y. 2021-22)

## Patriotism of Republic Day

Patriotism is the love and pride for one's nation to an extent of sacrificing even one's life for the betterement of it. A great sense of patriotism was shown by our freedom fighters during their struggle for independence. A soldier is also considered to be a patriot who loves and respects his country and is ready to sacrifice his life for the development of it. Does that mean only soldiers and freedom fighters are patriots?

Patriotism can be defined as the love for the main nation to the extent of sacrificing your life for betterment of it. A person who supports his or her country and is ready to defend it against enemies is called a patriot. A true patriot is considered to be the backbone of the nation. Patriotism is required for growth of a nation. The patriotism of a person is tested during important times likes the sudden outbreak of a pandemic, a war, during national disasters and national emergencies. We could say that our freedom fighters were the best example of patriotism. During that time every Indian wanted one thing and it was to have freedom from British Rule. Many freedom fighters worked together to achieve the indepeudence. They are the true example of patriot who did not think about their lives and made a lot of sacrifices to bring independence to our country.

**Essay written by student**


Name :- Sakshi Sandip Rananavare.

Date : / /
Page No.:

# • Importance of Voting •

"A man without a vote is a man without security"

Voting is a fundamental right of any citizen that let's them select the leaders of tomorrow. In most countries, the minimum age for voting is 18 years voting not only allows the citizen to vote for political parties but in addition, it enables them to realize the significance of citizenship.

Lots of people don't vote, believing one vote won't make a change. However, as a manner of fact, it will. A nation's political bases are made using elections. It is said that

"We do not have goverment by the majority, We have goverment by the majority who participate"


Voting is a fundamental process that keeps a country's goverment system votes. it enables the citizens to choose their own goverment Additionally it allows the people to choose their representative In the goverment is the objective of each goverment is to develop and implement several policies for the benifit of it's own citizens.

Additionally, it enables the individual who has the right to question the goverment about issues & clarification. Voting is the best way to express the openion of a citizen in a

**Essay written by student**

# Glimpses of the Rangoli Competition on importance of voting

# (A.Y. 2021-22)




**Rangoli drawn by students on National voter’s day**




**Rangoli drawn by students on National voter’s day**




**Rangoli drawn by students on National voter’s day**

# Glimpses of the Magh Wari Police Mitra Activity

# (A.Y. 2021-22)

दामाजी एक्सप्रेस
सोलापूर जिल्हा परिसर

# माघ वारीतही स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा प्रशासनाला मदतीचा हात

## विद्यार्थ्यांनी केली वारकऱ्यांची मनोभावे सेवा




पंढरपूर : स्वेरी इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या माघ वारीत देखील पोलीस प्रशासनाला मदत करून जणू पंढरीला पांडुरंगाच्या दर्शनासाठी आलेल्या वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. विद्यार्थ्यांचे हे सामाजिक कार्य पाहून सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) तेजस्वी सातपुते यांनी प्रत्यक्ष येऊन स्वेरीच्या विद्यार्थ्यांची पाठ थोपटली आणि विशेष कौतुक केले.

पंढरपूर मध्ये कोरोना कालावधीनंतर प्रथमच माघ वारी समाधानकारक भरली होती. मरगळ झटकून घालवून शेतकरी व वारकरी पंढरी नगरीत पांडुरंगाच्या भेटीला आले होते. यावेळी वारीच्या निमित्ताने पोलीस प्रशासनाने स्वेरी अभियांत्रिकीला मदतीची हाक दिली होती. स्वेरी अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी व फार्मसी या दोन्ही महाविद्यालयातील मिळून साधारण ३५ विद्यार्थी सलग पाच दिवस प्रशासनाला सहकार्य करत होते. चारही दिवस पंढरपूर मधील अंबाबाई पटांगण आणि शहराच्या मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक या महत्वाच्या ठिकाणी उभारलेल्या पोलीस मदत केंद्रात दररोज तीन टप्यात हे विद्यार्थी वारकऱ्यांना मदत करत होते. विद्यार्थ्यांमधील मदत करण्याचा उत्साह पाहून पोलिसांवरील ताण काही प्रमाणात का होईना कमी झाला. स्वेरीच्या विद्यार्थ्यांच्या उस्फुर्त सहभागामुळे पोलीस प्रशासनाला खूप मदत झाल्याची भावना पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी व्यक्त केली. स्वेरीने स्थापनेपासून शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात देखील भरीव कामगिरी करत साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. आषाढी वारी असो अथवा कार्तिकी वारी असो पांडुरंगाच्या दर्शनासाठी आलेल्या वारकऱ्यांना मनापासून मदत करण्याचे काम स्वेरीचे विद्यार्थी करत असतात. यंदा देखील प्रशासनाच्या हाकेला प्रतिसाद देत संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अभियांत्रिकीचे राष्ट्रीय सेवायोजनेचे अधिकारी डॉ. महेश मठपती तसेच फार्मसीच्या राष्ट्रीय सेवायोजनेच्या अधिकारी प्रा. स्नेहल चाकोरकर यांच्या नेतृत्वाखाली अभियांत्रिकी व फार्मसीचे राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी सलग चार दिवस भाविकांना माहिती देण्याचे कार्य करत होते. यामध्ये शहरातील मठ, लॉज, धर्मशाळा, रुग्णालये, भोजन व्यवस्था, शहराबाहेर जाणारे विविध रस्ते याचबरोबर, हरवलेली व्यक्ती अथवा चुकलेल्या व्यक्ती यांना उदघोषणेद्वारे नातेवाईकांच्या स्वाधीन करणे, आदी वारी संबंधित महत्वपूर्ण कामे स्वेरीच्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी केले.

यामध्ये अक्षय माने,प्रशांत लांडगे,संतोष खिलारे,सुनिल कारंडे,शंकर नरळे,गोरक्षनाथ शेजाळ,आदित्य काशीद, उमेश मदने,महेश देशमुख, सुहास गाढवे,ओंकार बाबर,तृप्ती सोनार, सोनल निकम, शेफाली गड्डम, दीप्ती कदम,तेजश्री डोंगरे, कोमल धुमाळ, मोहिनी जमदाडे, धनश्री म्स्के,ज्ञानेश्वरी माळी, सुप्रिया खेडकर, अखिलेश कुटे,अजिंक्य लोखंडे,गणेश तोडकर,अनिकेत बनसोडे, आकाश सुडके, विशाल लिंगडे यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम करून प्रशासनाला सहकार्य केले. यावेळी पोलीस प्रशासनातर्फे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम,पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरुण पवार, निर्भया पथकाचे प्रमुख पो.उ.नि. प्रशांत भागवत हे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी सौ. कुसुम क्षीरसागर, प्रसाद औटी, अरबाज खाटिक, अविनाश रोडगे,निलेश कांबळे यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. त्यांनीही स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक केले. प्रशासनाला बहुमोल मदत केल्याबद्दल स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे त्यांनी आभार मानले. यावेळी स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज, विद्यार्थी अधिष्ठाता प्रा. करण पाटील व प्रा. यशपाल खेडकर यांनी समन्वयक म्हणून कार्य पाहिले.

**News article about Police Mitra activity**

# Glimpses of the Vaccination drive for student, parents and faculty under mission swastha activity




**COVID-19 vaccination drive in SVERI**



एकमत दि.२९ ऑक्टोबर २०२१

# स्वेरीत 'कोविड लसीकरण मोहिमे'चे उदघाटन

**प्रतिनिधी/पंढरपूर**

कोरोना सारख्या काळात सर्वात प्रथम स्वेरीने सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे कोरोना महामारीवर काही प्रमाणात का होईना नियंत्रण ठेवण्यास यश मिळाले. अत्यंत अवघड काळात स्वेरीचे सहकार्य लाभल्यामुळे हे शक्य झाले. पंढरपूरमध्ये डॉ. रोंगे यांनी सर्वप्रथम त्यांचे संपूर्ण कॉलेज व वसतिगृहे आरोग्य विभागाला, रुग्णांना अलगीकरण व विलगीकरणासाठी उपलब्ध करून दिली. एकुणच स्वेरी शैक्षणिक क्षेत्रात तर अग्रेसर आहेच परंतु सामाजिक कार्यात देखील मागे नाही हेच सिद्ध झाले असून आज शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळेच स्वेरीचे नाव टॉपवर आले आहे.' असे प्रतिपादन पंढरपूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या 'मिशन युवा स्वास्थ'अंतर्गत 'इंटरनल क्वालिटी अशयुरन्स सेल' व स्वेरीच्या अभियांत्रिकी व फार्मसीच्या 'राष्ट्रीय सेवा योजने'तर्फे स्वेरी महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग यांच्यासाठी आयोजिलेल्या कोविड-१९ च्या लसीकरण मोहिमेच्या उद्घाटन प्रसंगी आरोग्य अधिकारी डॉ.बोधले मार्गदर्शन करत होते.

प्रास्तविक स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी केले. यावेळी अमित महाडिक, डॉ.संध्या पाटील, डॉ. शुभांगी गुंजाळ, डॉ.महेश गुरव, आरोग्य सेवक प्रशांत घोडके, संतोष लिगाडे, श्रीमती संगीता जाधव, बी.डी.माने, बी.यु.ढेरे, के.एस. घायाळ, एम.जी.सावंत, पाटील, होनराव तसेच गोपाळपूर व कासेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र आरोग्य सेवक, कर्मचारी, आरोग्य सेविका व आशा वर्कर्स यांचे सहकार्य लाभले.

या प्रसंगी १०२ जणांनी लसीकरणाचा लाभ घेतला. सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ ठिगळे यांनी तर आभार डॉ. महेश मठपती यांनी मानले.

**News article about COVID-19 vaccination drive in SVERI**

# Glimpses of the

# HIV AIDS Quiz activity







**HIV AIDS Quiz activity**




**HIV AIDS Quiz activity**

# News articles in newspaper about events in SVERI

# स्वेरीमध्ये 'राष्ट्रीय मतदार दिवस' संपन्न



पंढरपूर– गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये ११ वा 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा झाला. प्रास्ताविकात प्रा.यशपाल खेडकर यांनी 'राष्ट्रीय मतदार दिवसा'ची माहिती दिली. संस्थेचे संस्थापक सचिव व इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी 'राष्ट्रीय मतदार दिवसा'चे औचित्य साधून आपण भारतीय नागरिकांनी आपली राष्ट्रीय कर्तव्ये पार पाडताना एक भारतीय म्हणून आपली नेमकी कोणती भूमिका असावी? याचे विवेचन करत मतदान करण्याचे महत्त्व पटवून दिले. यावेळी २००८ साली स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून उत्तीर्ण होवून बालाजी अमाईन्स कंपनीमध्ये नोकरी करत असलेल्या सागर पांढरे या माजी विद्यार्थ्याचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, 'आजही आपल्या समाजातील अनेक लोक हे आपल्या मतदानाच्या राष्ट्रीय कर्तव्याबाबत जागरूक असल्याचे दिसत नाही. आपल्या आजूबाजूच्या सर्व मतदारांना आपण या गोष्टीची जाणीव करून देणे आवश्यक आहे. असे केले तरच जगातील सर्वात मोठी असणारी आपली लोकशाही टिकणार आहे असेही डॉ. बी.पी. रोंगे यांनी सांगितले. यावेळी स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज प्रा. एम. एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, प्रा. सतीश मांडवे उपस्थित होते.

# वाहन चालविताना वेगाबरोबरच मन आणि भावनांना मुरड घालावी : सपोनि प्रवीण संपागे

## स्वेरीत ३२ व्या 'रस्ते सुरक्षा अभियान २०२१' बाबत मार्गदर्शन



पंढरपूर,दि. ६ (प्रतिनिधी) 'वाहतुकीचे नियम पाळताना सर्व नियम पाळणे आवश्यक आहे. वाहन चालवताना सीट बेल्ट लावणे अत्यंत गरजेचे आहे. याचा तोटा होणार नाही परंतु फायदा मात्र नक्कीच होतो. ट्राफिक हवालदार दिसल्यानंतर ट्रिपल सीट दुचाकी चालविताना पाठीमागे बसलेला मित्र वाहन थांबविण्यापुर्वीच उडी मारतो. हे देखील एक अपघाताचे कारण आहे. वाहन चालकांनी हे लक्षात ठेवा की कायदा हा दंड वसुलीसाठी नसून तसेच वाहकांना त्रास देण्यासाठी नसून तो नागरिकांमध्ये वाहतुकीची शिस्त लागावी यासाठी उचललेले पाऊल आहे. रस्ते वाहतूक अपघात टाळण्यासाठी सर्वात प्रथम मनाला, भावनांना मुरड घातली पाहिजे. तुफान वेगात वाहन चालवण्याच्या आसुरी आनंदापासून दूर राहिले पाहिजे. अपघात होऊ नये यासाठी शासनाने घालून दिलेले नियम कटाक्षाने पाळले पाहिजेत. आपली, आपल्या कुटुंबीयांची आणि समाजाची सुरक्षितता आपल्या हातात असल्यामुळे आपण नेहमीच वाहतुकीचे प्रत्येक नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे.' असे आवाहन सोलापूर ग्रामीणचे वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपागे यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक (सोलापूर ग्रामीण) तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे व जिल्हा वाहतूक शाखेचे पो.नि. सूर्यकांत कोकणे व स.पो.नि.प्रवीण संपागे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस दल, वाहतूक सुरक्षा दल सोलापूर ग्रामीण व स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीच्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉलमध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या '३२ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२१' च्या निमित्ताने स्वेरीच्या अभियांत्रिकी व फार्मसीच्या प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 'रस्ते सुरक्षा वाहतूक' विषयी वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे हे बहुमोल मार्गदर्शन करत होते. प्रास्ताविकात प्रा. यशपाल खेडकर यांनी कार्यक्रमाचे स्वरूप सांगून रस्ते सुरक्षा अभियानाची माहिती दिली. 'मत करो इतनी मस्ती, जिंदगी नही सस्ती, वेगाने वाहन चालवू नका, मृत्यूस आमंत्रण देऊ नका, हेल्मेट लगाव, जीवन बचाव, जो चुकला नियमाला, तो मुकला जीवनाला, डोके आहे सर्वात नाजूक हेल्मेट लावून व्हा जागरूक, हेल्मेट आयुष्याचा झकास आधार, आयुष्यावर प्रेम करा गाडीच्या वेगावर नको' असे वाहतुकीसंदर्भात विविध स्लोगन त्यांनी ऐकविले. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे म्हणाले की, 'भारताचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांच्या 'व्हिजन' च्या माध्यमातून भारतभर चार ते आठ पदरी रस्ते तयार करण्याचे काम मोठ्या जोमाने, युद्धपातळीवर सुरू आहे. परंतु अपघाताच्या वाढत्या प्रमाणावर नियंत्रण बसेना. त्याचे कारण म्हणजे आपण नियमांचे पालन योग्य प्रकारे करत नाही. आज रस्ते, महामार्ग अपघातात दरवर्षी लाखों नागरिकांचे बळी पडत आहेत. अपघाताच्या माध्यमातून काही वेळा वाहतूकदारांची चूक असते, त्यातून रस्त्याची दुरवस्था हे देखील कारण नागरिक सांगतात. परंतु रस्ता सुरक्षेचे नियम पालन करताना स्वतःची काळजी घेतली तर आपले, आपल्या कुटुंबाची आणि साहजिकच समाजाची काळजी आपण घेवू शकतो. प्रत्येक वाहनधारकांनी सुरक्षेची जाणीव ठेवून वाहन चालविल्यास अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकते. यासाठी आपल्यापासून वाहनाची, अपघात होऊ नये म्हणून नियमांची काळजी घेवूयात.' असे सांगून त्यांनी वाहतुकीविषयी माहिती दिली. सपोनि प्रवीण संपागे पुढे म्हणाले की, 'आज केवळ हलगर्जी पणाने वाहने चालवून रस्ते अपघाताचे प्रमाण वाढत आहे. यासाठी अपघात होऊ नये म्हणून वाहतुकीचे सर्व नियम पाळा. वाहन चालताना मानसिकता चांगली असावी, स्पर्धेच्या युगात वाहनावर कंट्रोल ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.' असे सांगून अपघात होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले.

यावेळी वाहनामुळे झालेल्या अपघाताची आकडेवारी सादर करताना 'भारतात वर्षाकाठी सरासरी दीड लाख लोकांचा मृत्यू हा वाहन अपघातामुळे होतो तर साडेचार लाख नागरिक या अपघातामुळे जखमी होतात. यात ही आकडेवारी वाढत आहे. एकूणच वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे अपघाताला सामोरे जावे लागत आहे. प्रत्येकाला 'शॉर्टकट' पाहिजे असतो. या 'शॉर्टकट' च्या नादात आपण हकनाक जीव गमावून बसतो.यासाठी काळजी घेण्याची गरज आहे.' असे सांगून ए.पी. आय. संपागे यांनी वाहतुकीचे नियम स्पष्ट केले. यावेळी सहायक पोलीस उपनिरीक्षक शिवाजीराव साठे, पोलीस कॉस्टेबल चंद्रशेखर भोसले, पोलीस कॉस्टेबल सागर ढोरे-पाटील, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. सचिन गवळी, विभागप्रमुख, प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रंगनाथ हरिदास, शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा यशपाल खेडकर यांनी केले तर डिप्लोमाचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी आभार मानले.

# उपजिल्हा रुग्णालयाने आयोजिलेल्या स्पर्धेत स्वेरी प्रथम

## जागतिक एड्स दिन पंधरवडा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**पंढरपूर (लक्ष्मीपुत्र) - एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर व उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एच. आय. व्ही. / एड्स, टि. बी. जनजागृती शॉर्ट व्हिडीओ स्पर्धेत स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर ने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.**

येथील उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे 'जागतिक एड्स दिन पंधरवडा' निमित्त व न्यू इंडियाच्या अमृत महोत्सवानिमित्त जनजागृती उपक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयीन युवक-युवतींकरीता एच. आय. व्ही./ एड्स, क्षयरोग, रक्तदान या विषयांवर पोस्टर स्पर्धा व शॉर्ट व्हिडिओ मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व फार्मसी महाविद्यालयाने बाजी मारली.



प्रारंभी परम प्रसाद चॅरिटेबल ट्रस्टच्या विहान प्रकल्पाच्या माध्यमातून गरजूंना मोफत ब्लँकेट वाटप करण्यात आले तसेच एच.आय.व्ही. संक्रमण रोखण्याचा संकल्प करण्याकरीता कॅन्डल मार्चचे आयोजन केले होते. यावेळी मोठ्या प्रमाणात 'रेड रिबन'चे बोधचिन्ह व २०२१ या वर्षाचे घोषवाक्य अधिक आकर्षित होत होते. यात शेवट असमानतेचा, शेवट एड्सचा, शेवट संसर्गित रोगाचा अशी विविध घोषवाक्ये, रांगोळी आणि पोस्टरद्वारे साकारली. स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोपाळपुरला 'शॉर्ट व्हिडिओ मेकिंग' मध्ये प्रथम क्रमांकाचे रोख रु. पाच हजाराचे बक्षीस अक्षय माने, नितिन एकमल्ली, इरफान मुलाणी, निहाल मुजावर, मदन पाटील व रोहित खंडागळे यांनी पटकावले. रु. तीन हजारचे दुसरे बक्षीस विभागून स्वेरी फार्मसीचे प्रतिक जाधव व ग्रुप तसेच अहमद नदाफ यांना विभागून मिळाले तर स्वेरीच्याच आरती बंडगर, ज्ञानेश्वरी दास, ऐश्वर्या पाटणे, अश्विनी मोरे व अन्वी जाधव यांना रु. दोन हजाराचे तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एआरटी सेंटरचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सयाजी गायकवाड यांनी केले.यावेळी त्यांनी आय.सी. टी. सी./एआरटी च्या माध्यमातून केलेल्या कामाचा आढावा सादर केला. या सेंटरच्या माध्यमातून संसर्गितांना मोफत औषधोपचार, समुपदेशन, सीडी-फोर चाचणी, वायरल लोड चाचणी आदी महागड्या चाचण्या मोफत केल्या जातात.

अध्यक्षीय भाषणात वैद्यकीय अधीक्षक डॉ. गिराम म्हणाले कि, 'कोरोनाच्या जागतिक महामारीच्या कालावधीत एच.आय.व्ही संसर्गितास वेळेवर औषध उपचार व त्यांचे कोरोना लसीकरण यशस्वीपणे राबवित आहे तसेच कोणताही भेदभाव न करता चाचण्या, औषधोपचार तसेच संसर्गित गरोदर मातांना प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतर मोफत सेवा दिल्या जातात.' जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांनी 'सोलापूर जिल्ह्यातील संसर्गित आकडेवारी सादर करून त्यांना दिल्या जाणाऱ्या मोफत शासकीय सुविधा, विविध योजना, एक खिडकी योजना व इतर सवलती यांची सविस्तर माहिती दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता नागेश देवकर, संतोष शेंडगे, दिपक गोरे, एजाज बागवान, योगीराज विजापुरे, युवराज वांगी, संदीप देशमुख, बाळासाहेब पांढरे, श्रीमती मीनाक्षी कदम, स्वाती कसबे, रूपाली देवकर, सुज्ञाता गायकवाड, वैशाली वाघमारे, सुरेखा साठे, तुकाराम साठे, भारत सोनवणे, श्रीमती राजश्री टकले यांनी विशेष परिश्रम घेतले.

संसर्गित रुग्णांच्या बाबत भेदभाव न करणे व समानतेची वागणूक देण्यात यावी यासाठी सर्वांना शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरचे वैद्यकीय अधीक्षक तथा नोडल ऑफिसर डॉ. अरविंद गिराम, के. बी. पी. कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ.लतिका बागल, स्वेरीचे विद्यार्थी अधिष्ठाता प्रा. करण पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.महेश मठपती, जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी, डॉ.दत्तात्रय काळेल, डॉ.दत्तात्रय चौधरी, प्रा. टी. एस. जोशी, प्रा. यशपाल खेडकर, ए.आर.टी विभागाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सयाजी गायकवाड, डॉ. प्रसन्न भातलवंडे, डॉ. आशा घोडके, डॉ.संभाजी भोसले, डॉ. अविनाश वुईके, डॉ. विनिता कार्यकर्ते, श्रीमती सिंधू लवटे, सहाय्यक रेखा ओंबासे, लतिका उराडे, मनीषा कुलकर्णी, मंगल कर्चे, रेवती नाडगौडा, अनुराधा वाघमारे हे उपस्थित होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष नामदेव कागदे, उपाध्यक्ष अशोक भोसले तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम कदम यांनी तर बाजीराव नामदे यांनी आभार मानले.

# स्वेरीत आल्यावर ऑक्सफर्ड मध्ये आल्याचा भास झाला : आयएएस जे. पी. डांगे

**आयएएस जे.पी.डांगे यांची स्वेरीला सदिच्छा भेट**



# स्वेरीच्या इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागामध्ये करिअर मार्गदर्शन सत्र संपन्न





पंढरपूरः श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात 'करिअर अपॉर्च्युनिटीज फॉर इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंग ग्रॅज्युएटस' या विषयावर ऑनलाइन मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग मध्ये पदवी संपादन केल्यावर कोणत्या संधी करियर साठी उपलब्ध आहेत याची माहिती करून देणे हा या ऑनलाइन सत्राचा उद्देश होता. या सत्रात मार्गदर्शक म्हणून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभाग प्रमुख डॉ. दीप्ती तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग मधून पदवी संपादन केल्यानंतर खाजगी कंपन्यांमध्ये तसेच शासकीय कंपन्यांमध्ये असणाऱ्या संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स व्यवसायामध्ये आपला वेगळा ठसा कसा उमटू शकतात हे पटवून सांगितले. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी करावी लागणारी मेहनत व त्याचा होणारा फायदा यावर देखील त्यांनी आपले विचार मांडले. यानंतर ट्रेनिंग विभागाचे अधिष्ठाता प्रा. अविनाश मोटे यांनी विविध कंपन्यांमध्ये निवड होण्यासाठी स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये दिल्या जाणाऱ्या ट्रेनिंग व प्लेसमेंट बाबत मार्गदर्शन केले. तसेच या ट्रेनिंगजचा स्वेरी मधील विद्यार्थ्यांना कंपनीमध्ये निवड होण्यासाठी कसा फायदा होत आहे हे देखील स्पष्ट केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे अतिशय उत्तम रित्या दोन्ही मार्गदर्शकांनी निरसन केले. यामध्ये तृतीय वर्ष पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या जवळपास दीडशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा. धनराज डफळे यांनी या सत्राचे समन्वयक म्हणून काम पाहिले तर प्रा. अस्मिता सनगर यांनी सूत्रसंचालन केले. शेवटी प्रा. अनिल टेकाळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# उत्तम नियोजनामुळे स्वेरी अग्रेसर-नितालचे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू

दै.राजस्व

सचिन झाडे

पंढरपूरः “आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये सोलापूर जिल्ह्याचा विचार केला असता स्वेरीमधील शैक्षणिक पद्धतीचे व “पंढरपूर पॅटर्नफ चे अनुकरण करण्यासारखे आहे. नियोजन असो अथवा “पंढरपूर पॅटर्नफची शिक्षण पद्धती असो, याद्वारे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात दिवसेंदिवस भर पडून प्रगती साधली जात आहे. डॉ.रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक अभ्यासक्रमाचे नियोजन उत्तम पद्धतीने करून त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे स्वेरीच्या विद्यार्थ्यांना विशेष यश मिळत असते. या कारणांमुळे स्वेरीच्या प्रत्येक शैक्षणिक उपक्रमांकडे राज्याचे लक्ष लागलेले असते. त्यामुळे स्वेरीतून मिळणाऱ्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.फ असे प्रतिपादन निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडचे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या “इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगफ आणि “इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगफ या विभागांच्या संयुक्त विद्यमाने “इ स्क्वेअर -लॉजिक २ के २१फ या ऑनलाइन उपक्रमाच्या उदघाटन प्रसंगी निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड चे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्तविक समन्वयक प्रा. प्रगती ताठे यांनी करून कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा सांगितली. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी पवार यांनी या कार्यक्रमातील पाहुण्यांची ओळख करून दिली. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.




दीप्ती तंबोळी यांनी इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागाच्या अल्पावधीत घेतलेल्या गरुडझेपेची माहिती दिली तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाची माहिती डॉ. व्ही.जी.कळे यांनी दिली. विशेष अतिथी अशोक सराफ म्हणाले की, “या स्पर्धांमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन गुणांना व कल्पकतेला वाव देण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण झाले असून सादरीकरणाच्या माध्यमातून नवीन प्रोजेक्ट, संकल्पना सादर करणे आवश्यक आहे. या स्पर्धात्मक कार्यक्रमामुळे संशोधनाला अधिक गती येणार आहे.फ या राज्यस्तरीय उपक्रमात पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, आयडिया प्रेझेंटेशन, टेक्नीकल क्वीज आणि सॉफ्टवेअर सिमुलेशन अशा प्रकाराच्या स्पर्धा झाल्या. सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, “एका नवीन विचारातून दुसऱ्या नवीन विचाराची निर्मिती होत असते. यासाठी विद्यार्थ्यांनी तांत्रिक संशोधनाकडेही अधिक लक्ष द्यावे. अशा स्पर्धेतून भविष्यात अनेक विद्यार्थी संशोधक म्हणून निर्माण होतील.फ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट संबंधीची सविस्तर माहिती देताना प्रा.आशिष जाधव यांनी आत्तापर्यंत स्वेरीत आलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि कंपन्यांसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या याविषयी माहिती दिली. या एक दिवसीय ऑनलाइन चाललेल्या तंत्रस्पर्धेत राज्यातील विविध महाविद्यालयांतील जवळप-

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajas

# पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठाचा 'उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार' डॉ. बी.पी. रोंगे यांना प्रदान




**पंढरपूर,दि.५(प्रतिनिधी)**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या वतीने दिला जाणारा यंदाचा 'उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार' सोलापूर जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांना महाराष्ट्र राज्याचे महामहीम राज्यपाल तथा कुलपती भगत सिंह कोश्यारी यांच्या ऑनलाईन उपस्थितीत आणि आमदार सुभाष देशमुख व कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करून पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पंढरपूर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांची उच्च तंत्रशिक्षण घेण्यासाठी परगावी जाण्यासाठी होत असलेली धावपळ, त्यासाठी होणारा पैशाचा अपव्यय आणि सर्वात महत्वाचे म्हणजे वेळेचा अपव्यय या बाबी लक्षात घेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे उत्तम करिअर घडवावे या उदात्त हेतूने डॉ. बी.पी.रोंगे सर व त्यांच्या सहकाऱ्यांनी एकत्र येऊन सन १९९८ साली गोपाळपूर (ता.पंढरपूर) च्या माळरानावर श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर नावाच्या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. स्वेरीने शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम आणि नाविन्यपूर्ण तंत्राचा अवलंब करत राज्यात 'पंढरपूर पॅटर्न' ची स्वतंत्रपणे ओळख करून दिली.

सन १९९८ पासून ते आजतागायत विद्यार्थ्यांची तंत्रशिक्षणातील गोडी वाढतच आहे. केवळ शिक्षण देणे हा उद्देश नसून प्रत्येक विद्यार्थी हा सुसंस्कारित व्हावा या हेतूने स्वेरीकडून वेळोवेळी नवनवीन उपक्रम राबवले जातात. त्यामुळे आता ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील विद्यार्थी देखील स्वेरीकडे वळत आहेत. वार्षिक परीक्षांचा निकाल असो, विद्यार्थी प्रवेश संख्या असो अथवा कंपनीमध्ये प्लेसमेंट होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या असो, स्वेरी या सर्व बाबतीत जिल्ह्यात अग्रेसर आहे. आज सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अभियांत्रिकी क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणात गोडी निर्माण करून ती टिकवण्याचे अवघड काम डॉ.बी.पी. रोंगे सरांनी केले आहे. सोलापुर विद्यापीठ अंतर्गत आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरिंग आणि इतर अशी एकूण १०९ महाविद्यालये आहेत. सोलापूर विद्यापीठाने आदर्श प्राचार्य पुरस्कारासाठी प्रस्ताव मागितले होते. त्यात वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता, संशोधनातील कार्य, आदी बाबींचा समावेश आहे.

डॉ. रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली तीन विद्यार्थ्यांनी आत्तापर्यंतचा पीएच.डी.चा अभ्यासक्रम पूर्ण केला असून आणखी तिघेजण संशोधक विद्यार्थी पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन घेत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर डॉ.बी.पी. रोंगे सरांचे एकूण ३२ शोधनिबंध प्रसिद्ध आहेत तसेच दोन महत्त्वाचे पेटंटस देखील त्यांच्या नावावर आहेत. डॉ. बी.पी.रोंगे सरांना यांना आतापर्यंत मराठा समता भूषण पुरस्कार, निर्भीड अवार्ड, लोकराज्य छत्रपती शाहू महाराज पुरस्कार, सकाळ एक्सलन्स अवार्ड, प्राऊड महाराष्ट्रीयन अवार्ड, ग्लोबल कल्चर अवार्ड असे विविध पुरस्कार मिळालेले आहेत. तसेच डॉ. बी.पी.रोंगे सर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअर्स, कोलकाताचे माजी अध्यक्ष, आय.एस.टी.ई. नवी दिल्लीचे आजीवन सदस्य आहेत. राज्यस्तरावर वालचंद कॉलेज ऑफ सांगलीचे कमिटी फॉर ऑटोनॉमीचे अध्यक्ष तसेच एम.सी.सी.चे ते जॉईंट सेक्रेटरी आहेत.

पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठातील मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य, अॅकेडमिक कौन्सिल सदस्य, सिनेट सदस्य अशा विविध समित्यांवर ते कार्यरत आहेत तर विविध आंतरराष्ट्रीय परिषदांमधून शोधनिबंध सादर करण्यासाठी त्यांनी सिंगापूर , जपान, चीन आदी ठिकाणी परदेश दौरे देखील केलेले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या १६ व्या दीक्षांत समारंभ प्रसंगी डॉ. बी.पी.रोंगे सरांना 'उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कारा' ने सन्मानित करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे विविध पदाधिकारी, स्वेरीच्या विश्वस्त सौ.प्रेमलता रोंगे व इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ.बी.पी.रोंगे सरांना 'उत्कृष्ठ प्राचार्य पुरस्कार' मिळाल्यामुळे स्वेरीचे अध्यक्ष नामदेव कागदे, उपाध्यक्ष अशोक भोसले तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज, स्वेरी अंतर्गत असलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, अभियांत्रिकी व फार्मसीचे सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत संवाद

# पेटंट आणि रिसर्च विषयांवर डॉ. पवार यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी
पंढरपूर

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अ‍ॅन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार यांनी डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना 'बेसिक्स ऑफ पेटंट फिलिंग" व 'हाऊ टू डू रिसर्च" या दोन महत्वपूर्ण विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली झूम अ‍ॅपच्या सहाय्याने या ऑनलाइन मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. भारत सरकारच्या एआयसीटीई अर्थात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून दिला जाणारा 'विश्वेश्वरय्या बेस्ट टीचर अवॉर्ड" मिळविलेले स्वेरीचे शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार हे पहिल्या दिवशी 'बेसिक्स ऑफ पेटंट फिलिंग" या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'आजच्या शैक्षणिक युगात पेटेंट फाईलींगला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. जागतिक पातळीवर भारत देशाचा विचार करता पेटंटच्या बाबतीत आपण कुठेतरी कमी पडत आहोत. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना पेटेंट फायलिंग म्हणजे नेमके काय ? याची माहिती असणे महत्त्वाचे आहे." असे सांगून पेटंट फायलिंग करण्याबाबतचे भारत व इतर देशातील विविध नियम सांगून याबाबत डॉ.प्रशांत पवार यांनी सखोल माहिती दिली

तर दुसऱ्या दिवशी डॉ. पवार 'हाऊ टू डू रिसर्च" या महत्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये संशोधनाला विशेष महत्व प्राप्त झाले असून किंबहुना संशोधनातून सामाजिक समस्या सोडवणे ही काळाची गरज बनली आहे.

# उत्तम नियोजनामुळे स्वेरी अग्रेसर-नितालचे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू

दै.राजस्व

सचिन झाडे

पंढरपूर: ङ्गआज शैक्षणिक क्षेत्रामध्ये सोलापूर जिल्ह्याचा विचार केला असता स्वेरीमधील शैक्षणिक पद्धतीचे व ङ्गपंढरपूर पॅटर्नफ चे अनुकरण करण्यासारखे आहे. नियोजन असो अथवा ङ्गपंढरपूर पॅटर्नफची शिक्षण पद्धती असो, याद्वारे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात दिवसेंदिवस भर पडून प्रगती साधली जात आहे. डॉ.रोंगे सरांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक अभ्यासक्रमाचे नियोजन उत्तम पद्धतीने करून त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते. त्यामुळे स्वेरीच्या विद्यार्थ्यांना विशेष यश मिळत असते. या कारणांमुळे स्वेरीच्या प्रत्येक शैक्षणिक उपक्रमांकडे राज्याचे लक्ष लागलेले असते. त्यामुळे स्वेरीतून मिळणाऱ्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.फ असे प्रतिपादन निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेडचे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या ङ्गइलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगफ आणि ङ्गइलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगफ या विभागांच्या संयुक्त विद्यमाने ङ्गइ स्क्वेअर -लॉजिक २ के २१फ या ऑनलाइन उपक्रमाच्या उदघाटन प्रसंगी निताल कॉम्प्युटर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड चे माजी उपाध्यक्ष सुदर्शन नातू मार्गदर्शन करत होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्तविक समन्वयक प्रा. प्रगती ताठे यांनी करून कार्यक्रमाची सविस्तर रूपरेषा सांगितली. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी पवार यांनी या कार्यक्रमातील पाहुण्यांची ओळख करून दिली. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.




दीप्ती तंबोळी यांनी इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागाच्या अल्पावधीत घेतलेल्या गरुडझेपेची माहिती दिली तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाची माहिती डॉ. व्ही.जी.कळे यांनी दिली. विशेष अतिथी अशोक सराफ म्हणाले की, ङ्गया स्पर्धांमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन गुणांना व कल्पकतेला वाव देण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण झाले असून सादरीकरणाच्या माध्यमातून नवीन प्रोजेक्ट, संकल्पना सादर करणे आवश्यक आहे. या स्पर्धात्मक कार्यक्रमामुळे संशोधनाला अधिक गती येणार आहे.फ या राज्यस्तरीय उपक्रमात पेपर प्रेझेंटेशन, पोस्टर प्रेझेंटेशन, आयडिया प्रेझेंटेशन, टेक्नीकल क्वीज आणि सॉफ्टवेअर सिमुलेशन अशा प्रकाराच्या स्पर्धा झाल्या. सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, ङ्गएका नवीन विचारातून दुसऱ्या नवीन विचाराची निर्मिती होत असते. यासाठी विद्यार्थ्यांनी तांत्रिक संशोधनाकडेही अधिक लक्ष द्यावे. अशा स्पर्धेतून भविष्यात अनेक विद्यार्थी संशोधक म्हणून निर्माण होतील.फ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट संबंधीची सविस्तर माहिती देताना प्रा.आशिष जाधव यांनी आत्तापर्यंत स्वेरीत आलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या आणि कंपन्यांसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या याविषयी माहिती दिली. या एक दिवसीय ऑनलाइन चाललेल्या तंत्रस्पर्धेत राज्यातील विविध महाविद्यालयांतील जवळप-

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajas

# शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी योग आवश्यक : डॉ. रोंगे

**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर, दि. २२ जून -**

श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. योगा केल्याने मन, बुध्दी आणि शरीर यांच्यात समतोलपणा राहतो. शरीर स्वास्थ्य आणि मनाच्या एकाग्रतेसाठी योग आवश्यक आहे, असे प्रतिपादन स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांनी केले. या उपक्रमात सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. प्रा. सचिन भोसले, कॅम्पसचे इन्चार्ज प्रा. एम. एम. पवार, प्राचार्य डॉ. मिथुन मनियार, डॉ. एन.डी.मिसाळ, प्रा. सतीश मांडवे, प्रशासन अधिष्ठाता प्रा. सचिन गवळी, डॉ. प्रशांत पवार, डॉ. रणजित गिड्डे, डॉ. धनंजय चौधरी, प्रा. करण पाटील, प्रा. आशिष जाधव, प्रा. अविनाश मोटे, विभागप्रमुख डॉ. संदीप वांगीकर, डॉ. मीनाक्षी पवार, डॉ. दीप्ती तंबोळी, डॉ. सोमनाथ ठिगळे, डॉ. सतीश लेंडवे, प्रा. बी.डी. गायकवाड, सतीश बागल, बालाजी सुरवसे, संतोष जाधव, मधुकर मोरे, सुहास तगारे, संतोष माने व इतर शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. प्रा.यशपाल खेडकर यांनी सुत्रसंचालन केले.

# स्पर्धात्मक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरसाठी प्रेरणा मिळते : प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ

**पंढरपूरः हॅलो प्रभात**

'सध्याचे युग हे स्पर्धेचे युग असून जो अधिक गुणवत्ता सादर करतो तोच भविष्यात यशस्वी होतो. यासाठी विद्यार्थ्यांनी सतत विविध स्पर्धांमध्ये सहभागी व्हायला पाहिजे. स्पर्धेमुळे गुणवत्तेची तुलना होते आणि आपल्यातील कच्चे दुवे सुधारण्यासाठी चालना मिळते. एकुणच स्पर्धात्मक कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअर करण्यासाठी एक प्रकारची प्रेरणा व प्रोत्साहन मिळते.' असे प्रतिपादन स्वेरी संचलित डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉम्प्यूटर सायन्स अँन्ड इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. सोमनाथ ठिगळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय 'स्पिरीट २ के २१' या एक दिवसीय ऑनलाईन तांत्रिक संशोधन महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. प्रास्तविकात समन्वयक डॉ. सोमनाथ ठिगळे यांनी




'स्पिरीट २ के २१' कार्यक्रमासंबंधी नियमावली आणि सविस्तर माहीती दिली. 'स्पिरीट २ के २१' या राज्यस्तरीय स्पर्धेत ई-पेपर प्रेझेंटेशन आणि व्हर्च्युअल कॅम्पस हे इव्हेंन्टस् ऑनलाइन झाले. ई- पेपर प्रेझेंटेशन या उपक्रमात स्पर्धकांनी आपले बौध्दीक कौशल्य दाखविले. यामध्ये महाराष्ट्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातून एकूण ५० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यावेळी आयकॉनचे शिक्षक समन्वयक प्रा. एस. एस. कदम, प्रा. पी. जी. गायकवाड, विद्यार्थी अध्यक्षा फिजा शेख, उपाध्यक्ष भूषण देशमुख, सचिव अक्षय माने, कार्यक्रम समन्वयक वैष्णवी जठार, सानिका व्यवहारे, रोहित कवितके यांच्यासह बाहेरून आलेले स्पर्धक आदी उपस्थित होते. याचे लाईव्ह फेसबुकद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते. सूत्रसंचालन फिजा शेख यांनी केले तर आभार सहसमन्वयक प्रा. जी. एस. सरदेशमुख यांनी मानले.

# स्वेरीत 'इनोव्हेशन म्बेसिडर ओरीएंटेशन सिरीज' हा ऑनलाईन उपक्रम संपन्न

**पंढरपूर (लक्ष्मीपुत्र) - स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि 'इन्स्टिटयूशन्स इनोव्हेशन कौन्सिल' सेल (आय. आय. सी.) तर्फे 'स्वेरीज् आय.आय. सी. इनोव्हेशन म्बेसिडर ओरीएंटेशन सिरीज' या दोन दिवसीय ऑनलाईन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, डॉ. विद्याराणी क्षीरसागर व डॉ. सोमनाथ ठिगळे यांच्या नेतृत्वाखाली दि.२७ व २८ ऑगस्ट या दोन दिवशी या उपक्रमाचे आयोजन केले होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अजूनही महाविद्यालये बंद आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम ऑनलाईन स्वरुपात घेण्यात आला. या उपक्रमात १०० हून अधिक प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता.


उदघाटन प्रसंगी बी. फार्मसीचे प्रभारी प्राचार्य डॉ. मिथुन मणियार हे इन्स्टिटयूशन्स इनोव्हेशन कौन्सिलच्या कार्याबद्दल माहिती सांगताना म्हणाले की, 'एखाद्या रोपट्याचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर करण्याप्रमाणे एखाद्या लहान संकल्पनेचे रूपांतर मोठ-मोठ्या प्रकल्पांमध्ये करण्यासाठी इनोव्हेशन म्बेसिडरचे कार्य खूपच उपयुक्त असते.'


कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, डिप्लोमाचे प्राचार्य डॉ.नितीन मिसाळ यांनी पेटंटचे महत्त्व सांगताना म्हणाले कि, 'आपल्या कल्पनांचे व प्रकल्पाच्या माध्यमातून झालेल्या उत्पादनाचे पेटंट मध्ये रूपांतर व्हावे.' इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. दीप्ती तंबोळी यांनी 'इनोवेशन अँड इंटरप्रेनर इनीशियेटीवज प्रोग्राम' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वेरीतील आय.आय.सी.च्या अध्यक्षा डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी 'नॅशनल एज्युकेशन पॉलिसीः रिसर्च इनोव्हेशन अँड इंटरप्रेनरशिप फॉर एच.ई.आय. याबद्दल महत्त्वाची माहिती दिली. यानंतर संशोधन अधिष्ठाता डॉ. रणजीत गिड्डे, कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनिअरींगचे विभागप्रमुख डॉ. सोमनाथ ठिगळे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे डॉ. प्रवीण ढवळे यांनी प्रकल्पासंबंधी महत्वाचे विचार मांडले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. अविनाश पारखे होते तर प्रा. विनायक साळवे, प्रा. दिग्विजय रोंगे यांच्यासह इतर प्राध्यापकांनी हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य केले. डॉ.महेश मठपती यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. विद्युलता पाटील यांनी आभार मानले.










**Pledge taking on Vasundhara Din**

# Glimpses of the Mock Parliament

# (A.Y. 2021-22)







**Mock Parliament Activity**

दैनिक तुफान क्रांती

रविवार २० नोव्हेंबर २०२२

# स्वेरीमध्ये 'ईलाइट' मंचातर्फे 'मॉक पार्लमेंट' सत्र संपन्न





**दै. तुफान क्रांती/पंढरपूर:**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या 'ईलाइट' मंचातर्फे विद्यार्थ्यांनी सादर केलेले एकदिवसीय 'मॉक पार्लमेंट' सत्र नुकतेच संपन्न झाले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. स्वेरी अभियांत्रिकी मध्ये हा उपक्रम विविध उद्देशांनी आयोजित केला जातो जसे कि, विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धती समजून घ्यावी, संसदेच्या कामकाजाचे ज्ञान प्राप्त करावे, सार्वजनिक समस्यांवर विचारमंथन करून त्यावर आपले मत मांडावे, विद्यार्थ्यांमध्ये इतरांच्या विचारांबद्दल आदर आणि सहिष्णुता निर्माण व्हावी, कोणतीही चर्चा पद्धतशीरपणे आणि प्रभावीपणे आयोजित करण्यासाठी संविधानातील नियमांचा आदर करणे, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे हे या उपक्रमाचे मुख्य हेतू आहेत. मॉक पार्लमेंट मध्ये भूमिका साकारताना इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी विविध राजकीय नेत्यांच्या भूमिका उत्तमपणे साकारल्या. जसे कि, संसदीय स्पीकर- साक्षी रनवरे, सहाय्यक सचिव यांची भूमिका स्वप्नाली पवार व कांचन व्यवहारे यांनी साकारली.

सत्ताधारी पक्षातून भूमिका साकारणारे विद्यार्थी याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेत दीपक पाटील, गृहमंत्री अमित शहा यांच्या भूमिकेत रितेश चव्हाण, स्मृती इराणी- शिवभक्ति देशमुख, वित्त मंत्री- स्वराली जोशी, कृषी मंत्री-सुयश गायकवाड, कायदा व न्याय मंत्री किरण रिजीजू-आदित्य सरडे, आरपीआय चे नेते रामदास आठवले यांच्या भूमिकेत ऋतुराज तारापूरकर, विरोधी पक्षनेते राहुल गांधीच्या भूमिकेत शिवराज मगर, समंथा अंबरीश-दिशा भट्टड, गुलाब कोर-प्रांजली उत्पात, विनया राऊत यांच्या भूमिकेत कॅन्नी संतांणी, प्रज्वल रेवांना-धनराज इंगळे, माधवी-वृषाली जानगवळी यांनी भूमिका साकारल्या. या मॉक पार्लमेंट सत्रामध्ये जवळपास ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी खासदारांच्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडल्या. श्रोते म्हणून द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.मोहम्मद मुशेब हे होते. सूत्रसंचालन वैष्णवी मुचलंबे आणि प्रांजली उत्पात यांनी केले तर रोहीत मिसाळ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

दामाजी एक्सप्रेस

दि.२० नोव्हेंबर २०२२



# स्वेरीमध्ये 'ईलाइट' मंचातर्फे 'मॉक पार्लमेंट' सत्र संपन्न



पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या 'ईलाइट' मंचातर्फे विद्यार्थ्यांनी सादर केलेले एकदिवसीय 'मॉक पार्लमेंट' सत्र नुकतेच संपन्न झाले.

स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. स्वेरी अभियांत्रिकी मध्ये हा उपक्रम विविध उद्देशांनी आयोजित केला जातो जसे कि, विद्यार्थ्यांनी संसदीय कार्यपद्धती समजून घ्यावी, संसदेच्या कामकाजाचे ज्ञान प्राप्त करावे, सार्वजनिक समस्यांवर विचारमंथन करून त्यावर आपले मत मांडावे, विद्यार्थ्यांमध्ये इतरांच्या विचारांबद्दल आदर आणि सहिष्णुता निर्माण व्हावी, कोणतीही चर्चा पद्धतशीरपणे आणि प्रभावीपणे आयोजित करण्यासाठी संविधानातील नियमांचा आदर करणे, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे हे या उपक्रमाचे मुख्य हेतू आहेत. मॉक पार्लमेंट मध्ये भूमिका साकारताना इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी विविध राजकीय नेत्यांच्या भूमिका उत्तमपणे साकारल्या. जसे कि, संसदीय स्पीकर- साक्षी रनवरे, सहाय्यक सचिव यांची भूमिका स्वप्नाली पवार व कांचन व्यवहारे यांनी साकारली. सत्ताधारी पक्षातून भूमिका साकारणारे विद्यार्थी याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेत दीपक पाटील, गृहमंत्री अमित शहा यांच्या भूमिकेत रितेश चव्हाण, स्मृती इराणी- शिवभक्ति देशमुख, वित्त मंत्री- स्वराली जोशी, कृषी मंत्री- सुयश गायकवाड, कायदा व न्याय मंत्री किरण रिजीजू-आदित्य सरडे, आरपीआय चे नेते रामदास आठवले यांच्या भूमिकेत ऋतुराज तारापूरकर, विरोधी पक्षनेते राहुल गांधीच्या भूमिकेत शिवराज मगर, समंथा अंबरीश-दिशा भट्टड, गुलाब कोर-प्रांजली उत्पात, विनया राऊत यांच्या भूमिकेत कॅन्नी संतांणी, प्रज्वल रेवांना-धनराज इंगळे, माधवी-वृषाली जानगवळी यांनी भूमिका साकारल्या. या मॉक पार्लमेंट सत्रामध्ये जवळपास ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी खासदारांच्या भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडल्या. श्रोते म्हणून द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.मोहम्मद मुशेब हे होते. सूत्रसंचालन वैष्णवी मुचलंबे आणि प्रांजली उत्पात यांनी केले तर रोहीत मिसाळ यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

News article about Mock Parliament in SVERI

# Glimpses of the Tree Plantation

# (A.Y. 2021-22)



**Tree plantation by auspicious hands of Hon.Prin.Dr.B.P.Ronge in SVERI campus**



**Tree plantation program in SVERI campus**